रजि.नं.पी.टी.आर.इ - १३ दिनांक : १२/११/२०२१.

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

सन २०२० - २०२१ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे परिपत्रक
(फक्त विश्वस्त संस्था सभासदांसाठी)

अहमदनगर जिल्हा वाचनालय विश्वस्त संस्थेची सन २०२० - २०२१ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २८/११/२०२१ रोजी सकाळी ठिक ११ वा. जिल्हा वाचनालयाच्या लो. टिळक सभागृहात संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर विचार करण्यासाठी घेण्यात येणार आहे. तरी आपण सर्व सभासदांनी सदर सभेस वेळेवर उपस्थित राहवे, ही विनंती.

- **विषय :-**

(१) मागील सर्वसाधारण सभा दि.२७/१२/२०२० चे आणि विशेष सर्वसाधारणसभा दि.११-०९-२०२१ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

(२) सन २०२० - २०२१ चा अहवाल कायम करणे.

(३) हिशोब तपासनीस श्री.के.जी.सप्तर्षी ॲण्ड कंपनी यांचे कडून तपासून आलेल्या सन २०२०-२०२१ चा जमाखर्च, ताळेबंद,पत्रकास मंजूरी देणे.

(४) विश्वस्त संस्था व वाचनालयाच्या सन २०२१ - २०२२ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

(५) सन २०२१ - २०२२ सालासाठी हिशोब तपासनीसांची नेमणूक करणे.

(६) संस्थेच्या घटनेतील नियमाप्रमाणे सन २०२१-२०२२ ते २०२५ -२०२६ या वर्षासाठी विश्वस्त मंडळाची निवड करणे.

(७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

आपला,
**विक्रम राठोड,**
प्रमुख कार्यवाह,
अहमदनगर जिल्हा वाचनालय, (विश्वस्त संस्था )
अहमदनगर.

---

**टिप** : १. सभेचे कामकाज संस्थेच्या घटनेतील नियमानुसार होईल.

२. सभेस आवश्यक गणपूर्ती न झाल्यास नियमांनुसार अर्ध्या तासानंतर उपस्थित सभासदांच्या उपस्थितीत सभेचे कामकाज सुरु करण्यात येईल.यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

३. ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी लेखी प्रश्न दि. २४/११/२०२१ रोजी सायं. ७ वाजेपर्यंत वाचनालयाचे ऑफिसमध्ये आणून द्यावेत. आयत्या वेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सूचना** - १. सन २०२० - २०२१ चा वार्षिक अहवाल व सन २०२०-२०२१ च्या जमा खर्चाची व उत्पन्न खर्चाची पत्रके वाचनालयाच्या www.ajivalibrary.org या वेबसाईट वर उपलब्ध आहेत. कृपया नोंद घ्यावी.

२. आपण आपला ई-मेल व मोबाईल नंबर पूर्ण पत्यासह वाचनालयात कळवावा.

३. प्रत्येक सभासदाने आपले छायांकित ओळखपत्र सोबत आणावे,उदा.वाहन परवाना,पॅनकार्ड,आधारकार्ड,इलेक्शन- -कार्ड,इ.या शिवाय निवड प्रकियेत व सभेच्या कामकाजात भाग घेता येणार नाही.